प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.०२ चा सरतपास.
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -रघुनाथ झामाजी भूडे

प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.०२ चा सरतपास वकील श्री एस.एम.पिंपळकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू.

माझे शपथपत्र नि.क्र.४७ मधील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे.

३. मी वादी व प्रतिवादी यांना ओळखतो मी वादी व प्रतिवादी यांचे वडील मयत गंगाराम किसन सोनारकर यांना ओळखत होतो. त्यांनी माझ्यासमक्ष दि.०७/०७/२०१६ रोजी मृत्युपत्र केले होते. सदर मृत्युपत्र हे मौजा मसाळा प.ह.न.३३ तहसिल उमरेड जि.नागपुर येथील शेत सर्व्हे नं. ४४ आ.रा.जी.२.९९ हे.आर.बाबत केले होते. त्यांनी सदर मृत्युपत्रान्वये उपरोक्त शेतजमिनीचा उत्तर-दक्षिण धुरा पाहुन पुर्वेकडील १.५० हे.आर शेती विनोद गंगाराम सोनारकर यांना त्यांच्या हक्कात सदर मृत्युपत्रान्वये दिली होती. तसेच सदर शेतापैकी पश्चीमेकडील १.४९ हे.आर शेतजमिन प्रेमसागर गंगाराम सोनारकर यांच्या हक्कात दिली होती.

४. प्रेमसागर व विनोद ही गंगाराम यांची दोन मुले होती. दि.०७/०७/२०१६ रोजीचे मृत्यूपत्र श्री.गंगाराम किसन सोनारकर यांनी दुय्यम निबंधक कार्यालय,उमरेड येथे केले होते. आता मला नि.क्र.४० यादीसोबत दाखल केलेले दस्त क्र.२ मृत्यूपत्र दाखविण्यात आले जे श्री.गंगाराम किसन सोनारकर यांनी माझ्यासमक्ष तयार केले होते त्यावर साक्षीदार म्हणून माझी सही आहे तसेच त्यावर माझ्या आंगठ्याची निशानी आहे तसेच दुसरा साक्षीदार म्हणून पुरूषोत्तम महादेव रेवतकर यांची सही व आंगठा आहे. तसेच मृत्यूपत्र तयार करणार म्हणून गंगाराम किसन सोनारकर यांची सही व आंगठा आहे. तसेच त्यावर अर्जनिस म्हणून सु.ग.वानखेडे यांची सही आहे. तसेच त्यावर साक्षीदार म्हणून माझा फोटो व मृत्यूपत्र तयार करणार म्हणून गंगाराम सोनारकर यांचा फोटो व दुसरा साक्षीदार म्हणून पुरूषोत्तम रेवतकर यांचा फोटो आहे. सदर मृत्यूपत्र हे दुय्यम निबंधक कार्यालय,उमरेड येथे नोंदनिकृत झाले होते, त्याचा नोंदणी क्र.२५५१/२०१६ असा आहे. पंजीबध्द करतेवेळेस संगणकावर

श्री.गंगाराम किसन सोनारकर, मी व पुरूषोत्तम रेवतकर यांचे फोटो निघाले असुन त्या गोषवा-यावर आम्हा तिघांच्या सह्या आहेत. सदर संगणकावर आमचे तिघांचे आंगठे घेतले होते. सदर सह्या ह्या श्री.गंगाराम किसन सोनारकर तसेच दुसरे साक्षीदार पुरूषोत्तम रेवतकर यांनी माझ्यासमक्ष केल्या होत्या. सदर सह्या मी ओळखतो, त्या त्यांच्याच सह्या आहेत. सदर मृत्यूपत्र मी वाचले होते त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.४८** देण्यात आला. सदर मृत्यूपत्र करतेवेळेस श्री.गंगाराम किसन सोनारकर यांची शारिरिक व मानसिक स्थिती चांगली होती.

सरतपास पूर्ण.

वादीचा व त्यांच्या वकीलांचा पुकारा केला असता गैरहजर

सबब प्रकरण वादीतर्फे उलटतपासाकामी तहकूब करण्यात आले.

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि ०५.०१.२०२६

समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह दि.न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड